# को.ए.सो. माध्यमिक विद्यामंदिर, शहाबाज

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१६ चा शाळेचा निकाल ९२.००% लागला. या परीक्षेत कु. पाटील विनिता राजेंद्र ८९.००% गुण मिळवून प्रथम आली. कु. पाटील कृतिक विरेंद्र ८७.८०% गुण मिळवून द्वितीय तर कु. टेमकर मृणाली जालिंद्र ८७.२०% गुण मिळवून तृतीय आली.

स्पर्धेच्या युगामध्ये आपल्या ग्रामीण भागातील शाळेचा विद्यार्थी मागे पडू नये म्हणून विविध स्पर्धा परीक्षांना विद्यार्थ्यांना प्रविष्ठ केले जाते. या स्पर्धा परीक्षांमध्ये रायगड जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत इ. ५ वी तील कु. रूची अमृत म्हात्रे ही विद्यार्थीनी जिल्हा गुणवत्ता यादीत तिसरी आली. मॉडर्न एज्युकेशन सोसायटी पुणे तर्फे घेण्यात आलेल्या एम.टी. एस.परीक्षेत ७५% विद्यार्थी प्रशस्तीपत्रक धारक ठरले. एज्युकेशन रत्नागिरी तर्फे घेण्यात आलेल्या के.टी.एस्. परीक्षेचा निकाल १००% लागला.

को.ए.सो. आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धेमध्ये उत्स्फूर्त गट सेवकपाल्य मराठी भाषेत कु. पाटील पूर्वा सुहास ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. कनिष्ठ गट इंग्रजी भाषेत कु.म्हात्रे हर्षल पद्माकर हा उत्तेजनार्थ ठरला. निबंध स्पर्धेत गट क्र. ४ मराठी भाषेत कु.म्हात्रे नियती तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी विषयात क्रमांक १ चे गुण मिळवणारी शाळा म्हणून नागु मास्तर ढाल आमच्या शाळेला मिळाली.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतुने अथर्व ट्रस्ट डोंबिवली तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय विविध ललित कला स्पर्धामध्ये कु. पाटील सलोनी प्रवीण कलारत्न पुरस्कार, कु. म्हात्रे साक्षी संजीव – कलागौरव पुरस्कार प्राप्त ठरले. तर कु.पाटील कौशल, कु. जुईकर भावेश, कु. पाटील मनस्वी, कु. पाटील वर्षा हे विद्यार्थी कला आविष्कार पुरस्काराचे मानकरी ठरले. ही स्पर्धा यशस्वीपणे राबविल्याबद्दल सहा.शिक्षिका सौ. स्मिता सतीश पाटील व सौ. प्रगती वैभव भगत यांना कलाश्री पुरस्कार मिळाला. शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री.डी.आर.पाटील सर यांना कलाभूषण पुरस्काराने तर शाळेला आदर्श विद्यालय पुरस्काराने गौरविण्यात आले.

रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघातर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. पूर्वा सुहास पाटील या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकावला. तर निबंध स्पर्धेत प्रशिक्षित पदवीधर गटात सौ. स्मिता सतीश पाटील यांना द्वितीय क्रमांक मिळाला.

परिसरातील जे.एस,डब्ल्यू. डोलवी पेण यांच्यातर्फे मुलींसाठी स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास शिबीर, आरोग्य शिबीर, करियर मार्गदर्शन शिबीरे संपन्न झाली.


कु. पाटील विनिता राजेंद्र
एस. एस.सी. (८९.००%)


कु. पाटील पुर्वा सुहास
मुख्याध्यापकसंघ वाक्स्पर्धा–तृतिय


श्रीम. पाटील स्मिता सतिश
मुख्याध्यापकसंघ निबंधस्पर्धा–व्दितीय


वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी शब्दांकूर हस्तलिखिताचे प्रकाशन करतांना रा.जि.प. अर्थ व बांधकाम समिती सभापती सौ. चित्राताई पाटील, अलिबाग पंचायत समिती सभापती सौ. सुगंधाताई पाटील, रा.जि.प. सदस्य ॲड. आस्वाद पाटील, युवा नेते सुप्रभास पाटील, शाळा समिती चेअरमन बाळूशेठ पाटील व इतर मान्यवर


कु. पाटील वर्षा राजेंद्र
माध्यमिक शिष्यवृत्तीधारक


कु. म्हात्रे रूची अमृत
प्रज्ञाशोध परीक्षा–शिष्यवृत्तीधारक


शाळेच्या आवारात वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करताना


वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांना ढालीचे वितरण करताना मान्यवर